ePaper

# "छत्रपतींच्या घराण्याविषयी आदर, पण निवडणुकांचं गणित वेगळं असतं" -संजय राऊत



| वर्ष - 6 | अंक - 46 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार , दिनांक 21 मे 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- तसे नाही तर असे तरी आलोच...!
- पिंपरी-चिंचवडमधील 'रेड झोन' बाबत लवकरच दिल्लीत उच्चस्तरीय बैठक
- चंद्रपुरात पेट्रोल टँकर-ट्रकच्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू



महाविकास आघाडी सरकार केवळ ढोलकी वाजविण्यात व्यस्त असून, नाना पटोले यांना स्मृतिभ्रंश झाला आहे. ते ट्रिपल टेस्ट का करु शकले नाही, याचे उत्तर या सरकारने दिले पाहिजे. फडणवीस म्हणाले की, "मला वाटते राज ठाकरेंनी दौरा पुढे ढकलला आहे, रद्द केलेला नाही. त्यामुळे जो रामभक्त अयोध्येला जाईल, त्याचे स्वागतच झाले पाहिजे. त्याला अडवणे चुकीचेच असून, ते अयोध्येला जेव्हाही जातील त्यावेळी त्यांचे स्वागतच होईल",

**-देवेंद्र फडणवीस,** विरोधी पक्ष नेते



"मुळात दौरा रद्द नाही तर स्थगित करत पुढे ढकलण्यात आला आहे. आम्ही कसे जायचे काय करायचे हे आम्हाला तुम्ही सांगायची गरज नाही, तुम्ही तुमचे पहा. त्यांना दुःख वाटलं असेल कदाचित त्याची सुपारी फुटली नसेल. काही लोकांना राजकारणाच्या सुपाऱ्या दिल्या असल्याची चर्चा आहे. ते राजकीय हित साध्य झालं नसेल म्हणून ते अस बोलत असावे. राज यांच्या तब्येतीच्या कारणास्तव हा दौरा स्थगित केला गेला आहे.

**राजू पाटील,** मनसे आमदार

## डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा पदवी प्रदान सोहळा उत्साहात

# "व्होकल फॉर लोकल" साठी वैद्यकीय क्षेत्राची भूमिका महत्त्वाची!

## देशाचे संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांचे प्रतिपादन

| पिंपरी | महाईन्यूज |

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'व्होकल फॉर लोकल'ची हाक दिली आहे. स्वदेशी - २ हा त्याच योजनेचा भाग आहे. स्वदेशीची पहिली हाक याच पुण्यातून लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी दिली होती, असे प्रतिपादन देशाचे संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी केले.आरोग्य, जैवतंत्रज्ञान क्षेत्रात तरुण चांगली कामगिरी करत आहेत. आत्मनिर्भर भारतासाठी वैद्यकीय क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे, असेही ते म्हणाले.





*अभय फिरोदिया --डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचा 13वा पदवीप्रदान समारंभात भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत अभय फिरोदिया यांना डॉक्टर ऑफ लेटर्स ही मानद पदवी देऊन गौरविण्यात आले.*

डॉ.डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाचा १३ वा पदवी प्रदान समारंभ शुक्रवार (दि.२०) संरक्षमंत्री राजनाथ सिह यांच्या उपस्थितीत पार पडला. कुलपती डॉ.पी.डी.पाटील, प्र कुलपती डॉ.भाग्यश्री पाटील, कुलगुरु डॉ.एन. जे.पवार, सचिव डॉ.सोमनाथ पाटील, विश्वस्त व संचालिका डॉ.स्मिता जाधव, कोषाध्यक्ष डॉ.यशराज पाटील उपस्थित हाते.

फोर्स मोटर्स कंपनीचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया, प्रतापराव पवार यांना डॉक्टर्स ऑफ लेटर्स, तर नागपूरच्या दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे प्र कुलपती डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांना डॉक्अर ऑफ सायन्स या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले. विविध विद्याशाखांतील २६ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, दहा विद्याशाखांतील २ हजार १९१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आले. त्यात १२ पीएच.डी, १ हजार ४१६ पदव्युत्तर पदवी, ७५४ पदवी व नऊ पदविधारकांचा समावेश आहे.

### कोरोना महामारीनंतर आरोग्य क्षेत्राचा आदर आणि महत्त्व वाढले...

➡राजनाथसिंह म्हणाले, कोरोना महामारीनंतर आरोग्य क्षेत्राचे महत्त्व आणि या क्षेत्राबद्दलचा जगभरातील आदर वाढला आहे. आरोग्य, निरोगीपणा याला आपल्या संस्कृतीत प्राधान्य आहे. शरीरासोबतच मनस्वास्थ्य देखील महत्त्वाचे आहे. सुख-दुखात, नफ्या-तोट्यात, विजय-पराजयात स्थितप्रज्ञ राहणे खूप महत्वाचे आहे. मनाचे संतुलन सर्वात महत्त्वाचे आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही जा मात्र देशाचा विसर पडू देऊ नका. तुमच्या आजवरच्या वाटचालीत ज्यांना तुम्ही कदाचित ओळखतही नाही अशा देशातल्या शेतकऱ्यांपासून मजूरापर्यंतच्या लहानसहान प्रत्येक घटकाचा वाटा आहे. त्यांच्या त्याग, बलिदानाची किंमत पैसे देऊन चुकवता येणार नाही. त्यामुळे या पुढच्या आयुष्यात लोकांशी स्नेहाने वागा, त्यांचा आदर करा, त्यांची सेवा करा. आपण चांगले डॉक्टर तर बनालच पण त्यापेक्षा अधिक चांगले माणूस व्हा, असे आवाहन राजनाथसिंह यांनी केले. कुलपती पी. डी. पाटील यांनी स्वागत केले.

# शरद पवारांकडून ब्राह्मण संघटनांना चर्चेचं निमंत्रण; मिटकरी, केतकी चितळे वादावर तोडगा?

## चर्चेला जाण्यावरून ब्राह्मण संघटनांमध्ये दोन मतप्रवाह

| पुणे | महाईन्यूज |

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडून राज्यातील अखिल भारतीय ब्राह्मण महासंघासोबतच विविध ब्राम्हण संघटनांना ब्राह्मण संघटनांना चर्चेसाठी निमंत्रण देण्यात आले आहे. आज (शनिवारी) पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालय येथे सायंकाळी ५ वाजता या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



एकीकडे मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांकडून ब्राह्मण समाजाबाबत करण्यात आलेली वक्तव्ये व दुसरीकडे शरद पवार यांच्याबद्दल सोशल मीडियावर व्यक्त करण्यात येणारी मते यांमुळे दुषित झालेलं वातावरण निवळण्याचा आणि काहीशी साखरपेरणी करण्याचा प्रयत्न बैठकीच्या माध्यमातून होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

शरद पवार यांच्या या बैठकीला जायचे की नाही यावर ब्राह्मण संघटनांमध्ये दोन मतप्रवाह निर्माण झालेत. परशुराम सेवा संघ, ब्राह्मण महासंघ या संघटनांनी या बैठकीला जाणार नसल्याचे सांगत चर्चेवर बहिष्कार घातला आहे. ब्राह्मण महासंघाचा कोणताही पदाधिकारी या बैठकीला जाणार नसल्याचे ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांनी स्पष्ट केले आहे. अन्य संघटना या बैठकीला जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

### पवारांचे निमंत्रण 2 ब्राह्मण संघटनांनी नाकारले

➡ राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडून राज्यातील अखिल भारतीय ब्राह्मण महासंघासोबतच विविध ब्राम्हण संघटनांना चर्चेसाठी निमंत्रण देण्यात आले आहे. मात्र शरद पवार यांच्या या बैठकीला जायचे की नाही यावर ब्राह्मण संघटनांमध्ये दोन मतप्रवाह निर्माण झाले आहेत. परशुराम सेवा संघ, ब्राह्मण महासंघ या संघटनांनी पवार यांचे निमंत्रण नाकारले असून या बैठकीला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. ब्राह्मण महासंघाचा कोणताही पदाधिकारी या बैठकीला जाणार नसल्याचे ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांनी सांगितले आहे. तर अन्य संघटना या बैठकीला जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

## वसंत मोरे अन् साईनाथ बाबर आले एकत्र

# तसे नाही तर असे तरी आलोच...!

## मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून डावलले जात असल्याचा वसंत मोरेंचा आरोप

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (MNS) शहराध्यक्ष नेते वसंत मोरे यांना शहरातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून डावललं जात असल्याची चर्चा सुरू होती. पक्षाचे प्रमुख राज ठाकरे हे पक्ष कार्यालयात येतील त्याचवेळी तिथे पाय ठेवेन, असा जाहीर निर्धारही मोरेंनी केला होता. यामुळे मनसेतील वाद समोर आला होता. आता मोरे आणि मनसेचे शहराध्यक्ष साईनाथ बाबर एकत्र आले असून, खुद्द मोरेंनीच याची फेसबुकवर माहिती दिली आहे.



वसंत मोरेंनी आज एक फेसबुक पोस्ट केली आहे. तसे नाही तर असे तरी एकत्र आलोच. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात थोड्याच वेळात हजर होतोय, असे मोरेंनी या पोस्टमध्ये म्हटले आहे. या पोस्टमध्ये त्यांचा आणि बाबर यांचं एकत्रित छायाचित्र आहे. या दोघांवरही शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे महापालिकेत केलेलं आंदोलन या दोघांना भोवलं आहे. या दोघांनाही पोलीस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. हे दोघेही आज पोलीस ठाण्यात हजर राहणार आहेत. मात्र, या निमित्ताने दोघे एकत्र आल्याचं पाहायला मिळत आहे. यामुळे मोरे आणि मनसेच्या पदाधिकाऱ्यांमधील वादावर पडदा पडल्याचं मानलं जात आहे.

### वसंत मोरेंसह साईनाथ बाबर अडचणीत! पोलिसांकडून गुन्हा दाखल

- मनसेच्या वतीने १७ मार्चला पाण्याच्या प्रश्नावरून पुणे महापालिकेत आंदोलन करण्यात आलं होतं. वसंत मोरे आणि साईनाथ बाबर हे परवानगी नसताना महापालिकेच्या तिसऱ्या मजल्यावर गेले होते. त्यांनी तिथे आंदोलन सुरू केलं होतं. त्यानंतर काही मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते अशा १०० ते १२५ जणांनी महापालिकेच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करत सुरक्षारक्षकांना ढकलून दिले. नंतर त्यांना महापालिकेच्या आवारात आत प्रवेश केला होता. त्यामुळे प्रवेशद्वाराची कडीही तुटली होती.
- महापालिकेच्या आवारात कोणतंही आंदोलन करण्यास मनाई असताना त्यांनी आंदोलन केलं होतं. या प्रकरणी महापालिकेच्या सुरक्षारक्षकाने लेखी तक्रार केली होती. त्यानुसार वसंत मोरे, साईनाथ बाबर यांच्यासह १०० ते १२५ कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी सात कलमाअंतर्गत हे गुन्हे दाखल केले आहेत. मोरे आणि साईनाथ बाबर यांना या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांना हजर राहण्यास सांगितलं आहे.

---

## निधी खर्च करण्याचा कालावधी संपला

# अजितदादांना खूष करण्यासाठी पुणे 'झेडपी'चा मार्चअखेर संपेना!

## मागील आर्थिक वर्षाची कामे पुणे जिल्हा परिषदेकडून अद्याप सुरू

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना खूष करण्यासाठी मार्चअखेर होऊन जवळपास दोन महिन्यांचा कालावधी होत आला तरी पुणे जिल्हा परिषदेचा मार्चएंड अद्याप सुरूच आहे. पुणे जिल्हा परिषदेने मार्चअखेर सर्वाधिक खर्च केला आहे, हे दाखविण्याचा जिल्हा परिषदेचा केविलवाणा प्रयत्न यातून सुरू आहे. पण, त्याचा चालू झालेल्या नव्या आर्थिक वर्षाच्या कामकाजावर परिणाम होत असून जिल्हा परिषदेचा मार्च एण्ड संपायला मुहूर्त कधी मिळणार, याकडे संपूर्ण पुणे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री या नात्याने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विकास कामांना विविध लेखाशिर्ष अंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी गतवर्षी जुलैमध्ये दिला होता. ऑगस्टमध्ये जिल्हा परिषदेने सर्वाधिक कामांचा समावेश असलेल्या जनसुविधा लेखाशिर्ष अंतर्गत असलेल्या पुणे जिल्ह्यातील कामांना प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानंतर मोठा गाजावाजा करीत ३१ डिसेंबरपर्यंत १०० दिवसांचा कार्यक्रम आखण्यात आला होता. या शंभर दिवसांच्या काळात अंदाजपत्रके तयार करणे, कार्यारंभ आदेश देणे, प्रत्यक्षात काम पूर्ण करणे व कामाची देयके देणे, असा हा कार्यक्रम होता.

वास्तविक ३१ डिसेंबरअखेर ही सर्व कामे पूर्ण होणे गरजेचे

### उपमुख्यमंत्र्यांनी लक्ष घालण्याची गरज

- पुणे जिल्हा परिषदेने ३१ मार्च २०२२ अखेर जास्तीत जास्त खर्च केल्याचा दावा खोडून काढण्यासाठी लांबलेला मार्चअखेर तत्काळ संपवून नवीन आर्थिक वर्षाच्या कामकाजाला सुरुवात करण्याची सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना द्यावी, अशी मागणी होत आहे.

# अभ्यास करता येत नसेल तर भाजपची कॉपी करा पण ओबीसी आरक्षण पास करा

## भाजपचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांची मागणी



**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

दोन वर्षांत घरात बसूनही सरकारला अभ्यास करता येत नसेल तर त्यांनी मध्य प्रदेशमधील भाजप सरकारची कॉपी करावी आणि ओबीसींचे राजकीय आरक्षण मिळवून द्यावे, अशी मागणी भाजपचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी केली. सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला ओबीसी आरक्षणानुसार निवडणुका घेण्यासाठी मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्रातही ओबीसींना राजकीय आरक्षण मिळावे या मागणीसाठी शहर भाजपच्यावतीने अध्यक्ष जगदीश मुळीक आणि ओबीसी प्रदेश अध्यक्ष योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वाखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. त्या वेळी मुळीक बोलत होते. ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, सरचिटणीस राजेश येनपुरे, दत्ताभाऊ खाडे, संदीप लोणकर सुशिल मेंगडे, धनंजय जाधव, गायत्री खडके, आरती कोंढरे, मनिषा लडकत, प्रशांत हरसुले, प्रतिक देसरडा, दीपक माने, नंदकुमार गोसावी, राजेश धोत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुळीक पुढे म्हणाले, राज्यातील ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण गमवावे लागले नसून, राज्य सरकारने ते पद्धतशीरपणे घालवले आहे. आरक्षण हातचे जात असताना छगन भुजबळ, धनंजय मुंडे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड हे ओबीसींचे प्रतिनिधित्व करणारे मंत्री केंद्र सरकारकडे बोट दाखवित निमूटपणे बसून राहिले. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारला वेळोवेळी सूचना केल्या, मात्र ठाकरे सरकारने

## शॉर्ट न्यूज »

### वेश्या व्यवसाय प्रकरणी दोघांना अटक; सहा जणांवर गुन्हा दाखल




। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

हिंजवडी येथे एका हॉटेलवर छापा मारून कारवाई करत हिंजवडी (HINJAWADI PROSTITUTION CASE) पोलिसांनी दोघांना अटक केली. अटक केलेल्या दोघांसह सहा जणांच्या विरोधात वेश्या व्यवसाय प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बुधवारी (दि. 18 मे) दुपारी पावणे चार वाजता लक्ष्मी चौकाजवळ हिंजवडी येथे हॉटेल आर. के. एक्सक्लुजीव येथे करण्यात आली. शुभम राजेंद्र ढेरे (वय 28, रा. नेकनूर, ता. जि. बीड), योगेंद्र बाळू कुंभार (वय 27, रा. हिंजवडी), सुनील मदार उर्फ राहुल, उर्फ जीजू, संजीत अमरनाथ सिंग, दोन महिला यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभम आणि योगेंद्र या दोघांना अटक करण्यात आली आहे. देहूगाव येथील महावितरणच्या कार्यालयास टाळे लावल्या प्रकरणी भाजपच्या दोन कार्यकर्त्यांवर गुन्हा

### देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे आश्वासन

# पिंपरी-चिंचवडमधील 'रेड झोन' बाबत लवकरच दिल्लीत उच्चस्तरीय बैठक!

## भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांची माहिती

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ६ लाख लोकांशी संबंधित तसेच शेकडो भूमिपुत्रांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला 'रेड झोन' कमी करण्याबाबत लवकरच दिल्लीत उच्च स्तरीय बैठक घेण्यात येईल. लोकहिताच्या दृष्टीने तांत्रिक बाजुंची पडताळणी करुन निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिले. संत तुकारामनगर येथील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयातील पदवी प्रदान सोहळ्याला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आले होते. या कार्यक्रमानंतर झालेल्या बैठकीत आमदार लांडगे यांनी 'रेड झोन' संदर्भातील निवेदन दिले. यावेळी भाजपा सरचिटणीस विजय फुगे, माजी नगरसेवक शांताराम भालेकर आदी उपस्थित होते.



संरक्षण मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात आमदार लांडगे यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड हे शहर महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील सर्वात वेगाने विकसित होणारे शहर म्हणून विकसित होत आहे. औद्योगिक वसाहत म्हणूनही शहराची ओळख आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यापासून संरक्षण विभागाचे दिघी, देहू रोड आणि ॲम्युनिशन डेपो आहेत. याठिकाणी संरक्षण विभागाने 'रेड झोन' तयार केला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये गेल्या २० वर्षांपासून स्थानिक लोकप्रतिनिधी रेड झोनची हद्द कमी करण्याचा मुद्दा लावून धरत आहेत. मात्र, अद्याप संरक्षण विभागाने सकारात्मक भूमिकेतून निर्णय घेतलेला नाही. ट

सध्या, रेड झोन २००० यार्डपर्यंत मर्यादित असून, शहरातील लाखो लोकांची घरे, उद्योग आणि व्यवसायांवर परिणाम होत आहे. दुसरीकडे, या भागात कोणतेही विकास काम व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात स्थानिक महापालिका प्रशासनाला अडचणी येत आहेत. शहरातील सुमारे ५० हजार घरे रेडझोनमुळे बाधित आहेत. या भागात वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या सुमारे सहा लाख इतकी आहे. विशेष म्हणजे, स्थानिक भूमिपुत्रांच्या जमिनी रेडझोनमध्ये असल्याने अनेक कुटुंब भूमिहीन झाली आहेत.

संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी ५०० ते ७०० मीटर इतकी रेडझोनची हद्द असावी, असा अहवाल दिला असताना संरक्षण विभागाने २००० हजार मीटर इतकी रेडझोनची हद्द ठेवली आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे. दरम्यान, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रेडझोन बाबत दिल्लीत संरक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेवू. त्यामध्ये तांत्रिक बाजुंची पडताळणी करुन निश्चितपणे हा विषय मार्गी लावू, असे आश्वासन दिले आहे.

### स्व. मनोहर पर्रिकरांचे कार्य राजनाथ सिंह पूर्ण करणार...

**देशाचे माजी संरक्षण मंत्री स्व. मनोहर पर्रिकर यांनी सकारात्मक भूमिका घेत हा विषय मार्गी लावण्याची भूमिका घेतली होती. मात्र, पर्रिकर यांचे अकाली निधन झाले. त्यामुळे पुन्हा हा विषय मागे पडला. संरक्षण विभागाने स्थानिक नागरिक आणि कुटुंबांचा विचार करता सकारात्मक भूमिका घेतल्यास तांत्रिक अटींची पूर्तता करुन रेडझोनची हद्द ५०० ते ७०० मीटरपर्यंत कमी होवू शकते. भाजपाच्या धोरणाप्रमाणे, समाजातील शेवटच्या घटकाच्या विकासाचा विचार व्हावा. यापार्श्वभूमीवर आपण सकारात्मक निर्णय घेतल्यास रेड झोन बाधित लोकांना न्याय मिळणार आहे. स्व. मनोहर पर्रिकर यांचे अपूर्ण राहिलेले कार्य आता विद्यमान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह पूर्ण करतील, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.**

# निगडी प्राधिकरण येथील निकृष्ट सिमेंट रोडची चौकशी व्हावी

## मनसे पिंपरी-चिंचवड शहरचे बाळा दानवले व स्वाती बाळा दानवले यांचे आयुक्तांना निवेदन



पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

निगडी प्राधिकरण सेक्टर 25 सावरकर सदन एल आय जी कॉलनी येथील महानगरपालिकेकडून गेल्या एक ते दीड वर्षापासून सिमेंटच्या रोडचे काम चालू आहे मुळात या रोडची कोणतीही गरज नसताना येथील रोड सुस्थितीत असताना काहींच्या आर्थिक फायद्यासाठी या रोड चा घाट घालण्यात आला मुळात या रोड मुळे नागरिकांना फायदा होण्याच्या ऐवजी त्यांना नहाक त्रास व आर्थिक झळ बसली आहे. या रोड मुळे गेल्या एक वर्षापासून नागरिकांच्या घरामध्ये वारंवार पाणी घुसत आहे कोणत्याही प्रकारची ड्रेनेजच्या बाबतीत किंवा रेन वॉटर च्या बाबतीत नियोजन केलेले दिसत नाही तसेच वेळोवेळी नळाचे कनेक्शन एम एस ई बी च्या लाईटच्या डीपीचे कोणत्याही प्रकारचे नियोजन नसल्यामुळे पाण्याचा व लाईटचा प्रश्न नागरिकांना वेळोवेळी उद्भवत आहे व अजूनही हा रोड पूर्णत्वास गेलेला नसून पावसाळा तोंडावर आलेला आहे त्यामुळे या ठेकेदारावर कारवाई करावी या मागणीचे निवेदन मनसे पिंपरी-चिंचवड शहरचे उपाध्यक्ष बाळा दानवले व स्वाती बाळा दानवले यांनी आयुक्तांना दिले आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की, या रस्त्याच्या कामांमध्ये निष्काळजीपणा व त्रुटी आढळून येत आहेत रस्त्याच्या दोन्ही बाजूला लोखंडी गज बाहेर असून नागरिकांना दुखापत होऊ शकते रस्त्याच्या कामामध्ये स्टीलचे प्रमाण कमी प्रमाणात वापरले असल्याचे जाणवत आहे अनेक भागांमध्ये रस्ता खचल्यासारखा वाटत आहे, रस्त्याच्या कडेच्या फूटपाथ वर निकृष्ट दर्जाचे गट्टू बसवलेले असून गट्टू खाली वर व काही ठिकाणी गट्टू तुटलेले जाणवत आहेत व रस्त्याच्या कडेचे डीवाईडर काही ठिकाणी पडलेले आहेत अशाप्रकारे रस्ता करताना निकृष्ट काम केलेलं आढळून आले आहे.

तरी हि रस्त्याचीअनेक कामे अजून राहिलेली असून वेळेत पूर्ण न केल्यामुळे व रस्ता निकृष्ट पद्धतीने बनवलेला आहे हे मा.आयुक्त साहेब यांच्या निदर्शनास आणून दिला व या रस्त्याच्या कामाची व ठेकेदाराची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून कार्यवाही करावी व राहिलेला रोड लवकरात लवकर करावा अन्यथा मनसे तर्फे आंदोलन केले जाईल याची नोंद घ्यावी. याबाबत माननीय आयुक्त साहेब यांना पत्र देण्यात आले असून आयुक्त साहेबांनी लवकरच चौकशी करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. यावेळी निवेदन देताना मनसे शहर उपाध्यक्ष बाळा दानवले, उपविभाग अध्यक्ष ओमकार पाटोळे, स्वाती दानवले, शरद पाटील, प्रसाद मराठे, इत्यादी उपस्थित होते.

## संपादकीय »

# प्रशासन, राज्यकर्ते आणि न्यायव्यवस्था यांच्यातील ताळमेळ

***'आपल्याला शिक्षेतून लवकर मुक्त करावे,' असा अर्ज अरिवूने तमिळनाडू सरकारकडे दिला होता; मात्र त्या अर्जावर निर्णय देण्यास राज्यपालांनी 'अक्षम्य विलंब' केल्याने, सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या १४२व्या कलमाने मिळालेला अधिकार वापरला आहे.***

राजीव गांधी यांची हत्या हा एक आंतरराष्ट्रीय कट होता. त्याचे धागेदोरे श्रीलंकेच्या पलीकडे किती दूरवर गेले होते, याचे नि:संदिग्ध उत्तर आजही मिळालेले नाही. असे असताना, सर्व आरोप सिद्ध झालेला गुन्हेगार तुरुंगातून बाहेर येतो, याचा अर्थ सामान्य नागरिकांनी काय लावायचा? टाडा न्यायालयाने २६ आरोपींना फाशीची शिक्षा ठोठविली असली, तरी पुढे सर्वोच्च न्यायालयाने मुरुगन, नलिनी, संथानम आणि अरिवू या केवळ चौघांची फाशी कायम केली. तिघांना जन्मठेप दिली आणि इतर १९ जणांवरचा टाडा काढून त्यांना मुक्त केले. असा तिपदरी निकाल असूनही, अरिवूची फाशी कायम राहिली, याचे गांभीर्य सर्व केंद्र सरकारांनी; तसेच तामिळनाडूतील द्रमुक आणि अण्णाद्रमुकच्या सत्ताधाऱ्यांनी ओळखले नाही; किंबहुना या मारेकऱ्यांच्या शिक्षेचे वारंवार राजकारण करण्यात आले. त्यामुळेच, आज अरिवू मुक्त झाला आहे. 'आपल्याला शिक्षेतून लवकर मुक्त करावे,' असा अर्ज अरिवूने तमिळनाडू सरकारकडे दिला होता; मात्र त्या अर्जावर निर्णय देण्यास राज्यपालांनी 'अक्षम्य विलंब' केल्याने, सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या १४२व्या कलमाने मिळालेला अधिकार वापरला आहे. 'संपूर्ण न्याय होण्यासाठी सर्वोच्च न्यायालय योग्य तो आदेश देऊ शकते,' असे या कलमात म्हटले आहे. राज्यपालांनी वेळीच अरिवूच्या अर्जावर निर्णय घेतला असता, तर आज ही वेळ आली नसती. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे फाशी आधीच रद्द झालेल्या नलिनी, मुरुगन; तसेच इतर पाच मारेकऱ्यांची शिक्षा संपून, तेही बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'नलिनीची फाशी करुणानिधी यांनी वाचवली,' असे एकीकडे आज नलिनीची आई म्हणत असताना, मुख्यमंत्री स्टॅलिन हे 'सर्वोच्च न्यायालयाचा आदेश म्हणजे मानवी हक्कांचा आणि राज्याच्या अधिकारांचा विजय आहे,' अशी प्रतिक्रिया देत आहेत. देशाच्या माजी पंतप्रधानांची हत्या करणाऱ्या गुन्हेगारांची प्रशासन, राज्यकर्ते आणि न्यायव्यवस्था यांच्यात ताळमेळ नसल्यामुळे सुटका होत असेल, तर त्यात राज्याच्या अधिकारांचा प्रश्न येतो कुठे?




## आनंदी सकाळ

# 'आयु: कर्म च वित्तं च विद्या निधनं मे वच:

प्रारब्धाचे भोग भोगत असताना वर्तमानात पुन्हा नवी वासनाजन्य कर्मे तयार होतात. त्याच्या भोगांना क्रियमाण म्हणतात. म्हणजे आजचे क्रियमाण उद्याचे संचित आणि ते ज्यावेळी भोगायला येते त्यावेळी प्रारब्ध! ते केव्हा व कसे भोगावे लागेल ते परमेश्वराच्या इच्छेवर आहे. काही कर्मे अशी की, त्याचे फळ ताबडतोब मिळते. उत्कट पाप किंवा पुण्य केले असेल तर त्याचे फळ याच जन्मात भोगावे लागते. शास्त्रकार सांगतात, 'त्रिभिर्मासै:, त्रिभिर्पक्षै:, त्रिभिरब्दै:, त्रिभिर्दिनैः' कर्माच्या तीव्रतेनुसार तीन महिन्यांत, तीन पंधरवड्यांत, तीन वर्षांत किंवा तीन दिवसांतही हे भोग भोगावे लागतात. जन्माच्या वेळीच आपले भाग्य, भोग ठरलेले असतात. 'आयु: कर्म च वित्तं च विद्या निधनं मे वच:। पञ्चैतानि विलिख्यन्ते गर्भस्वस्यै च देहिनः'।। गर्भातून बाहेर येताच आयुष्य, कर्म, धन, विद्या, मृत्यू हे पाच भोग प्रारब्धानुसार ठरलेले असतात. 'जे पेरावे तेच उगवते' हेच सत्य आहे. 'यथा धेनु सहस्त्रेषु वत्सो गच्छति मातरम्। तथा पूर्वार्जितं कर्म कर्तारं अनुगच्छति' हजारो गायी एकत्र उभ्या केल्या तरी ज्याप्रमाणे वासरू आपल्याच आईच्या आचळाला लागते तसे, केलेली कर्म भोगासाठी त्याच कर्त्याच्या मागे धावतात.

# ऑनलाईन गुणवत्ता ढासळू नये....



सत्तर टक्के शिक्षण ऑनलाइन पद्धतीने दिले, मग परीक्षा ऑफलाइन कशासाठी, असा प्रश्न करीत विद्यार्थ्यांनी 'ऑनलाइन'चा आग्रह धरला आहे. व्यवस्थेच्या बोटचेप्या भूमिकेने परीक्षा पेच निर्माण झाला आहे. या आग्रहात गुणवत्ता ढासळू नये, म्हणजे मिळविली...

विदर्भातील गडचिरोली आणि चंद्रपूर हे दोन जिल्हे गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतात. हा भाग तसा मागसलेला. अनेक गावांमध्ये जाण्यासाठी साधे रस्ते नाहीत. विजेची तर विचारायची सोय नाही. इंटरनेट म्हणजे काय, हेही अनेकांना ठाऊक नाही. इतकी बिकट परिस्थिती असतानाही, या भागातील विद्यार्थ्यांनी करोनाकाळात दूरवरचे अंतर गाठून दोन वर्षे ऑनलाइन पेपर दिले. अँड्रॉइड मोबाइल; तसेच इंटरनेट अशा सुविधांअभावी अनेकांना शिक्षणही घेता आले नाही. अशा वास्तवाच्या पार्श्वभूमीवर सद्यस्थितीत राज्यभरात परीक्षा ऑनलाइन की ऑफलाइन, यावरून वादंग माजला असताना, इथला आदिवासी विद्यार्थी शांत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ऑफलाइन परीक्षा आवश्यक असल्याचा विश्वास व्यक्त करीत तयारीला लागला आहे. या उलट नागपूर, अमरावती विद्यापीठांतून मात्र ऑनलाइन परीक्षेचा आग्रह धरला जात आहे. मोर्चे, आंदोलनांमधून वातावरण तापविले जात असल्याने, प्रशासनाला निर्णय घेणे कठीण होऊन बसले. महिना-दीड महिन्यापासून हा पेच सुरू आहे. चार दिवसांपूर्वी अमरावती विद्यापीठाने ऑफलाइनचा निर्णय घेतला. नागपुरात अजूनही पेच सुटलेला नाही. मे महिना संपायला दहा दिवस उरले असताना परीक्षा पद्धतीच ठरत नसल्याने निकाल, पुढल्या वर्गातील प्रवेश, नव्या सत्राच्या तारखा हे सारेच लांबत जाणार आहे. याबाबत बोलायला कुणीही तयार नसल्याने शिक्षण व्यवस्थेची कोंडी झाली आहे. मागील दोन वर्षांत करोना संकटाने अनेकांचे आयुष्य प्रभावित केले. विद्यार्थ्यांपासून नोकरदारांपर्यंत कुणीही सुटले नाही. अवघ्या जगाची कार्यपद्धती बदलली. या बदलात शिक्षणाचा ऑनलाइन ट्रेंड सुरू झाला. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग भरले. परीक्षाही ऑनलाइन झाली. काळाची गरज म्हणून हा बदल स्वीकारला गेला. करोना निर्बंध हटविल्यानंतर आता सारे काही सुरळीत होत आहे. ऑनलाइन वर्ग ऑफलाइनमध्ये परावर्तित झाले आहेत. अर्थात, हे दोन-तीन महिनेच होऊ शकले. दहावी-बारावीच्या परीक्षा ऑफलाइन झाल्या.

# ओबीसी आरक्षणाचा मुद्दा अद्यापही ऐरणीवरच...

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असता कामा नये, अशी हे आरक्षण रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाची भूमिका होती आणि ती आपल्याच पूर्वीच्या निर्णयाशी सुसंगत अशीच होती. तेव्हापासून म्हणजे जवळपास गेले सव्वा वर्ष या प्रश्नाचे भिजत घोंगडे तसेच पडले आहे.**

महाराष्ट्रात खरे तर १९९४ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना आरक्षण देण्यात आलेले होते. मात्र, मार्च २०२१मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण रद्दबातल ठरवत सहा जिल्हा परिषदा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अन्य निवडणुका या आरक्षणाविना घेण्याचे आदेश दिले आणि वादळ उठले. तेव्हापासून हा प्रश्न सर्वच पक्षांनी ऐरणीवर आणला असून, त्यामागील राजकारण लपून राहिलेले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असता कामा नये, अशी हे आरक्षण रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाची भूमिका होती आणि ती आपल्याच पूर्वीच्या निर्णयाशी सुसंगत अशीच होती. तेव्हापासून म्हणजे जवळपास गेले सव्वा वर्ष या प्रश्नाचे भिजत घोंगडे तसेच पडले आहे. या विषयास आणखी एक पदर आहे तो केंद्र-राज्य संघर्षाचा. सर्वोच्च न्यायालयाला हे आरक्षण निश्चित करण्यासाठी इम्पिरिकल डाटा हवा आहे. हा




डाटा केंद्र सरकार उपलब्ध करून देत नाही, असा आरोप महाराष्ट्र सरकार तेव्हापासून करत आले आहे.

मात्र, केंद्र हा डाटा देत नसेल तर तो जमा करण्याच्या जबाबदारीतून राज्य सरकारला हात झटकून मोकळे होता येणार नाही. त्यासाठी नेमण्यात आलेल्या आयोगाला प्रथम कार्यालय तसेच निधी पुरवण्यात बरीच हयगय केली गेली, हे वास्तव आहे. गेल्या काही आठवड्यात माजी मुख्य सचिव जयंत बांठिया यांच्या नेतृत्वाखालील या आयोगाच्या कामाला वेग आला असला तरी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीत राज्य सरकार हा डाटा सादर करण्यात अपयशी ठरले, हेही खरेच आहे. त्यामुळेच आठ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाविना या निवडणुका घेण्याचे आदेश मध्य प्रदेश सरकारला दिल्यानंतर त्या सरकारने वेगाने पावले उचलली आणि त्याचेच फळ शिवराजसिंहांना मिळाले आहे! महाराष्ट्र सरकारने मात्र हा डाटा जमा करण्यासंबंधात झडझडून प्रयत्न करण्याऐवजी या निवडणुकांबाबतचे सर्वाधिकार आपल्या हाती घेणारे विधेयकच विधिमंडळात मंजूर करून घेतले. अर्थात, तेव्हा त्या विधेयकास आज नाकाने कांदे सोलणाऱ्या भाजपनेही पाठिंबा दिला होता, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. मात्र तो कायदाही सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवत राज्य सरकारचा मुखभंग केला आणि या विषयाचे राजकारण मागील पानावरून पुढे सुरूच राहिले.

## ।। अभंगवाणी ।।



सांडिला लौकिक लाज भय चिंता ।
रातलें अनंता चित्त माझें ॥२॥
मज आतां कोणी आळवाल झणी । तुका
म्हणे कानीं बहिरी जालें ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### प्रियकराने प्रेयसीसमोरच तिच्या पतीचा केला खून

।औरंगाबाद। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

प्रेमसंबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा प्रेयसीसमोरच प्रियकराने कोयत्याने सपासप वार करत खून केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. १८) रात्री ८.३० वाजता महादेवपूर शिवार, मोंढे फार्म रस्ता, धूपकर यांच्या प्लॉटमध्ये घडली. पोलिसांनी प्रियकराला अटक केली असून, त्याच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी व कोयता जप्त केला आहे. न्यायालयाने त्यास तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याप्रकरणी प्रेयसीने नाशिक तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. प्रियकर संदीप पोपट गोतरणे (रा.मुक्त विद्यापीठ, गोवर्धन, नाशिक) असे अटक केलेल्याचे नाव आहे. वसंता जयराम झांजर (वय ४१, रा. बोरीपाडा, पो. चिंचओहळ, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) असे मृत्यू झालेल्या पतीचे नाव आहे.

### पेट्रोल वाहतूक करणारा टँकर आणि लाकूड नेणाऱ्या ट्रक यांच्यात समोरासमोर धडक

# चंद्रपुरात पेट्रोल टँकर-ट्रकच्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू!

### अपघातानंतर भीषण आग, आगीत ट्रकचे टायर फटले

।चंद्रपूर।महाईन्यूज। प्रतिनिधी।

चंद्रपूर-मूल मार्गावरील अजयपूर गावाजवळ पेट्रोल टँकर आणि ट्रकच्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. गुरूवारी रात्री 10.30 वाजताच्या सुमारास ही घटना घडली. पेट्रोल वाहतूक करणारा टँकर आणि लाकूड नेणाऱ्या ट्रक यांच्यात समोरासमोर धडक झाल्याची माहिती समोर येत आहे.

चंद्रपूर-मूल मार्गावरील अजयपूर गावाजवळ पेट्रोल टँकर आणि ट्रकच्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. गुरूवारी रात्री 10.30 वाजताच्या सुमारास ही घटना घडली. पेट्रोल वाहतूक करणारा टँकर आणि लाकूड नेणाऱ्या ट्रक यांच्यात



समोरासमोर धडक झाल्याची माहिती समोर येत आहे. या अपघातानंतर भीषण आग लागली. या आगीत ट्रकचे टायर फुटल्याने आग आणखी भडकली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी रात्री लाकडाने भरलेला ट्रक चंद्रपूरच्या दिशेने जात होते. तर, डिझेल भरलेला एक टँकर चंद्रपूरकडून येत होता. यावेळी अजयपूरजवळ या दोन्ही वाहनांचा अपघात झाला. या अपघातामुळे एका वाहनात लाकूड व दुसऱ्या वाहनात डिझेल असल्याने भीषण आग लागली.

या अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी मूल-चंद्रपूर अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, ही आग भीषण असल्यामुळे या आगीत मृत्यू झालेल्यांच्या मृतदेहांची राख झाली आहे. तसंच, या अपघातामुळे संपूर्ण रस्ताभर आग पसरल्याने मूल व चंद्रपूर मार्गावरील वाहतूक खंडित झाली. रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या.

### अपघातातील मृतांची नावे

या अपघाता एकूण ९ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये टँकरमधील चालक-वाहकांचा मृतांमध्ये समावेश आहे. तर लाकूड भरलेल्या ट्रकमधील सात जणांचा या घटनेत मृत्यू धाला. ट्रकमधील ७ जण बल्लारपूर तालुक्यातील नवी दहेली आणि कोठारी गावचे रहिवासी असल्याची माहिती आहे. चालक अक्षय सुधाकर डोंगरे (30) बीटीएस प्लॉट बल्लारशा, मजूर प्रशांत मनोहर नगराळे (28), कालू प्रल्हाद टिपले (35), मैपाल आनंदराव मडचापे (24),बाळकृष्ण तुकाराम तेलंग (40),साईनाथ बापूजी कोडापे (35), संदीप रवींद्र आत्राम (22) सर्व राहणार दहेली व टँकरचालक हाफिज खान (38) अमरावती, मजूर संजय पाटील (35) वर्धा अशी मृत व्यक्तींची नावे आहेत.

### तपास अधिकाऱ्यांकडून घटनेचा पंचनामा

चंद्रपूर,बल्लारशा, सीटीपीएस चंद्रपूर, पोंभूर्णा, मुल येथून अग्निशमन वाहन बोलाविण्यात आले. आग आटोक्यात आली असली तरी सकाळी 9 वाजेपर्यंत टँकर जळतच होता. सकाळीच अग्निशमन गाडीने पुन्हा आग विझवण्यात आली. तपास अधिकाऱ्यांनी घटनेचा पंचनामा करून सर्व जळालेले मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे पाठविण्यात आले आहेत.

### राज ठाकरे यांनी स्वत: ट्विट करत तूर्तास अयोध्या दौरा स्थगित करत असल्याचे केले स्पष्ट

# अखेर राज ठाकरेंचा अयोध्या दौरा स्थगित

### दौरा रद्द करण्यामागील कारण अद्याप अस्पष्ट

मुंबई ।महाईन्यूज ।

मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी अयोध्या दौरा स्थगित केल्याची घोषणा केली आहे. राज ठाकरे ५ जून रोजी अयोध्येला जाणार होते. मात्र, त्यांनी ट्विट करून तूर्तास आपण हा दौरा स्थगित करत असल्याचे जाहीर केले. यानंतर राज ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याला कडाडून विरोध करणारे खासदार बृजभूषण सिंह यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. बृजभूषण सिंह यांनी राज ठाकरेंच्या ५ जूनच्या अयोध्या दौऱ्याच्या विरोधासाठी शरयू स्नानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. राज ठाकरे यांचा दौरा रद्द झाला असला तरी माझा दौरा आणि



५ जूनचा कार्यक्रम होणारच आहे. आम्ही त्यादिवशी साधू-संतांच्या उपस्थितीत शरयू स्नान करू. आता राज ठाकरे अयोध्येत येणार नसल्याने आम्ही आणखी उत्साहात कार्यक्रम साजरा करू. आम्ही ५ जूनला योगी आदित्यनाथ यांचा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा करू, असे बृजभूषण सिंह यांनी सांगितले.

मनसेच्या नेत्यांकडून पक्षाच्या कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने अयोध्येत येण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यासाठी जवळपास १० रेल्वेगाड्या बुक केल्या जाणार होत्या. तरीही अयोध्येत मनसेचे किती कार्यकर्ते पोहोचू शकतात, याला एक मर्यादा होती.

तर बृजभूषण सिंह हे भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि खासदार आहेत. त्यामुळे उत्तर प्रदेशातील एक मोठा वर्ग त्यांच्या पाठिशी आहे. अशावेळी बृजभूषण सिंह यांचा विरोध झुगारून अयोध्येत गेल्यास राज ठाकरे आणि मनसेच्या कार्यकर्त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निश्चित नाकारता येत नव्हती. त्यामुळे राज ठाकरे अयोध्येत गेल्यास संघर्षाची शक्यता होती. मात्र, आता राज ठाकरे यांनी अयोध्या दौरा स्थगित केल्याने हा संघर्ष तूर्तास टळला आहे.

> राज ठाकरे यांच्या अयोध्या दौऱ्याला स्थगिती मिळाल्यानंतर संजय राऊत यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. इतर पक्षाचे ५ जून रोजी अयोध्येत काही कार्यक्रम होते. मात्र त्यांनी ते कार्यक्रम रद्द केल्याचं मला प्रसारमाध्यमांकडून समजलं आहे. त्यांना काही सहकार्य हवं असतं तर आम्ही ते केलं असतं. कारण अयोध्या आणि उत्तर प्रदेशात शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले होते.

# आज तुमचे दिवस... उद्या आमचे येतील!

### जामीन मिळाल्यावर संदीप देशपांडेंचा सरकारला इशारा

मुंबई ।महाईन्यूज ।

सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्यानंतर मनसे नेते संदीप देशपांडे हे अखेर १६ दिवसांनंतर माध्यमांसमोर आले आहेत. यावेळी संदीप देशपांडे यांनी आपली बाजू मांडताना राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. 'आम्ही सरकारविरोधात बोलू नये, आमचं तोंड बंद राहावं, यासाठी सरकारने हा प्रयत्न केला. आज तुमचे दिवस आहेत, उद्या आमचे येतील,' असा इशारा देशपांडे यांनी दिला आहे.

'प्रसारमाध्यमांचं जे फुटेज होतं ते स्वयंस्पष्ट होतं, आमच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला



होता आणि या गुन्ह्यासाठी अख्ख्या महाराष्ट्राचे पोलीस आम्हाला शोधत होते. तुमच्या फुटेजचे स्क्रीनशॉट माझ्या वकिलांनी कोर्टात दाखवले आणि सरकारने दबाव निर्माण करण्यासाठी आमच्यावर गुन्हे दाखल केल्याचं सांगितलं.

आमचा कायद्यावर पूर्ण विश्वास होता आणि त्याप्रमाणे आम्हाला न्याय मिळाला,' असं संदीप देशपांडे यांनी म्हटलं आहे.

## शॉर्ट न्यूज »

### आसाममध्ये पूरस्थिती गंभीर, 7 लाखांहून अधिक बाधित; 9 जणांचा मृत्यू

। दिसपूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

आसाममधील पूरस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून गुरुवारी परिस्थिती आणखीनचं बिकट झाली, यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. दरम्यान राज्यातील 27 जिल्हे आणि तिथे राहणाऱ्या सुमारे 7.18 लाख स्थानिक नागरिकांना या पुराचा फटका बसला आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दैनिक पुर अहवालानुसार, नागाव जिल्ह्यातील कांपूर महसूल क्षेत्रात बुडून एकाचा मृत्यू झाला. तर कामपूरमध्येही दोन जण बेपत्ता झाले आहेत. यासह राज्यात पूर आणि भूस्खलनामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या आता दहाच्यावर पोहचली आहे. असेही अहवालात म्हटले आहे. प्राधिकरणाने म्हटले की, पुरामुळे राज्यात 7,17,500 हून अधिक लोक बाधित झाले आहेत. दरम्यान बजली, बक्सा, बारपेटा, विश्वनाथ, बोनगाईगाव, कचार, दरांग, धेमाजी, धुबरी, दिब्रुगड, दिमा हासाओ, गोलपारा, हैलाकांडी, होजाई,

### रेल्वेमंत्री असताना रेल्वे भरतीत झालेल्या घोटाळ्याशी संबंधित प्रकरण

# लालू प्रसाद यादव यांच्या घरासह 17 ठिकाणांवर सीबीआयची छापेमारी

## तपास मोहीम अद्याप सुरूच, सीबीआय अधिकाऱ्यांकडून राबडी देवी यांचीही चौकशी

नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

केंद्रीय अन्वेषण विभागाने अर्थात सीबीआयने आज राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू यादव यांच्या घरासह त्यांच्याशी संबंधित दिल्ली आणि बिहारमधील 17 ठिकाणांवर छापेमारी केली आहे. दरम्यान यात राबडी देवी यांच्या पाटणातील शासकीय निवासस्थानावर देखील सीबीआयने छापा टाकला आहे. गेल्या दोन तासांपूर्वी ही छापेमारी सुरु झाली. पाटणासोबतचं सीबीआयने दिल्ली आणि इतर शहरांमध्येही एकाच वेळी 17 ठिकाणी छापेमारी केल्याची माहिती समोर येत आहे. हे संपूर्ण प्रकरण लालू प्रसाद यादव रेल्वेमंत्री असताना रेल्वे भरतीत झालेल्या घोटाळ्याशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी आता सीबीआय अधिकारी राबडी



देवी यांचीही चौकशी करत आहेत.

सीबीआय अधिकारी खताळ यांचीही चौकशी करत असल्याचे सांगण्यात येत आहे. रेल्वेत नोकरीच्या बदल्यात लालू यादव यांनी लोकांकडून जमिनी आपल्या नावावर करून घेतल्याचा आरोप आहे. खताळ यांच्या जमिनीबाबतही तेच बोलले जात आहे. लालू यादव – राबडी देवी यांचा धाकटा मुलगा तेजस्वी यादव पाटणात नसताना ही छापेमारी झाली आहे. दोन दिवसांपूर्वी तो लंडनला रवाना झाला होता. खुद्द लालू यादव सध्या त्यांची मोठी मुलगी आणि राज्यसभा सदस्य मीसा भारती यांच्या दिल्लीतील निवासस्थानी आहेत. पाटणा व्यतिरिक्त बिहारच्या गोपालगंज, दिल्ली आणि भोपाळमध्येही ही छापेमारी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

माजी मुख्यमंत्री राबडी देवी यांच्या पाटणा येथील 10, सर्कुलर रोड येथील निवासस्थानावर सीबीआयचे छापे टाकण्यात आले आहेत. सकाळी सीबीआयचे अधिकारी येथे पोहोचले तेव्हा घरातील लोकांना नीट जागही येत नव्हती. सीबीआय अधिकाऱ्यांनी राबडी देवी यांच्या निवासस्थानी प्रवेश करताच दरवाजे बंद केले. यानंतर आतून बाहेरून कोणालाही जाण्यास मज्जाव करण्यात आला. छापा सुरू झाल्यानंतर सुमारे एक तासाने सीबीआयचे अधिकारी राबडी देवी यांच्या घरी पोहोचले. झारखंड क्रमांकाच्या वाहनासह सीबीआय अधिकाऱ्यांना घेऊन जाणारी किमान तीन वाहने राबडी देवी यांच्या निवासस्थानाबाहेर उभी करण्यात आली आहेत. त्यानंतरही काही अधिकारी येथे येत राहिले.

राबडी देवी यांच्या निवासस्थानावर छापेमारीची बातमी समजताच लालू समर्थक आणि आरजेडीचे नेते आणि आमदार तेथे येऊ लागले. येथील वाढती गर्दी पाहता बॅरिकेडिंग करण्यात येत आहे. घराच्या आत आणि बाहेर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लालू यादव यांचे दोन वकीलही घटनास्थळी पोहोचल्याचे सांगण्यात येत आहे. राबडी देवी यांच्या निवासस्थानाबाहेर जमलेले तेज प्रताप यादव यांचे समर्थक कारवाई थांबवा अशा घोषणा देत आहेत.

### लालू यादव पाच वर्षे रेल्वेमंत्री होते

☛ लालू यादव 2004 ते 2009 या काळात संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये रेल्वेमंत्री होते. यादरम्यान त्यांच्यावर विविध घोटाळे केल्याचा आरोप करण्यात आला. सीबीआय या प्रकरणांचा तपास करत आहे. या प्रकरणांमध्ये यापूर्वीही छापे टाकण्यात आले आहेत.

# नवज्योतसिंग सिद्धू यांना एक वर्षाचा सश्रम कारावास

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

या प्रकरणात सत्र न्यायालयाने सिद्धू यांना 1999 साली निर्दोष सोडले होते. त्यानंतर उच्च न्यायालयाने 2006 साली सिद्धू यांना तीन वर्षांची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड केला होता. याविरोधात सिद्धू यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू यांना सर्वोच्च न्यायालयाने 34 वर्षे जुन्या मारहाणीच्या प्रकरणात एक वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या खटल्यासंबंधी दाखल पुनर्विचार याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी हा निर्णय दिला. सिद्धू यांनी केलेल्या मारहाणीत एका वृद्धाचा मृत्यू झाला होता. याआधी सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यात केवळ एक हजार रुपयांचा दंड आकारून त्यांची सुटका केली होती. कायद्याचा निर्णय आम्ही



स्वीकारतो, असे ट्विट सिद्धू यांनी केले आहे. अटकेनंतर त्यांची रवानगी पतियाळा तुरुंगात होण्याची शक्यता आहे. पतियाळा येथे पार्किंगवरून सिद्धू यांचे गुरनाम सिंग नावाच्या 65 वर्षीय व्यक्तीसोबत 1988 साली भांडण झाले होते.

या भांडणाचे रूपांतर हाणामारीत होऊन सिद्धू यांनी गुरनाम सिंग यांना मारहाण केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या मारहाणीनंतर गुरनाम सिंग यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर पोलिसांनी नवज्योतसिंग सिद्धू आणि त्यांचा मित्र रुपिंदरसिंग सिद्धू यांच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला.

# अदानी ग्रुपची आता आरोग्य क्षेत्रात एन्ट्री

## पिरामल हेल्थकेअर ही सरकारी कंपनी घेणार विकत



। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आशिया खंडातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आणि अदानी समूहाचे मालक सिमेंट क्षेत्रानंतर आता आरोग्य क्षेत्रात एन्ट्री घेणार आहेत. अदानी देशातील मोठ्या हॉस्पिटल्स, डायग्नोस्टिक चेन आणि ऑफलाईन आणि डिजिटल फार्मासीच्या अधिग्रहणाद्वारे आरोग्य क्षेत्रात प्रवेश करणार आहेत. यासाठी अदानी समूह एका नवीन कंपनीची स्थापना करणार आहे.

आता आरोग्य क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी समूह या क्षेत्रातील बड्या कंपन्यांशी चर्चा करत आहे. 4 बिलियन डॉलरपर्यंत हा व्यवहार होऊ शकतो. दरम्यान पिरामल हेल्थकेअर ही कंपनी आता सार्वजनिक क्षेत्रातील फार्मास्युटिकल फर्म HLL Lifecare Ltd (HLL) कंपनी खरेदी करण्याच्या तयारीत आहे. डिसेंबर 2021 मध्ये सरकारने कंपनीतील 100 टक्के हिस्सेदारी खाजगी संस्थांना विकण्याचा निर्णय घेतला होता. या कंपनीसाठी सात वेळा बोली लागली.

समूहाच्या बिझनेस इनक्यूबेटर फर्म अदानी एंटरप्राइजेस लिमिटेडने एक नियामक फाइलिंगमध्ये म्हटले की, अदानी समूहाने 17 मे 2022 रोजी त्यांची पूर्ण मालकीची उपकंपनी अदानी हेल्थ व्हेंचर्स लिमिटेड (AHVL) सुरु केली आहे.

हेल्थ व्हेंचर्स लिमिटेड (AHVL) हीच कंपनी आता अदानी समूहाच्या आरोग्य क्षेत्रासंबंधीत बाबींवर निर्णय घेणार आहे. यामध्ये इतर गोष्टींबरोबर, वैद्यकील आणि डायग्नॉस्टिक्स सुविधा, ऑपरेशन, प्रशासन, आरोग्यासंबंधीत मदत, आरोग्य तंत्रज्ञान- आधारित सुविधा, संसोधन केंद्र आणि इतर सर्व संलग्न आणि आपत्कालीन क्रिया प्रक्रियांचा समावेश आहे.

### सिमेंट क्षेत्रात प्रवेश

☛ एएचव्हीएलने सांगितले की, ते योग्य वेळी आपला व्यवसाय सुरु करतील, बंदरांपासून विमानतळ आणि उर्जेपर्यंत व्यवसाय चालवणाऱ्या या समूहाने एकूण 10.5 अब्ज डॉलर्सच्या स्विस सिमेंट निर्मात्या हॉल्सिमच्या इंडिया ऑपरेशन्सच्या माध्यमातून सिमेंट क्षेत्रात प्रवेश केला.




# कान्स फिल्म फेस्टमध्ये अवतरली ऐश्वर्या

बॉलीवूड दिवा ऐश्वर्या राय बच्चनने कान्स मध्ये हजेरी लावली असून तिच्या आरस्पानी सौंदर्याने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. यामुळे दिपिका पदुकोनपासून हॉलीवूडच्या नायिकाही तिच्या लूकपुढे फिक्या पडत आहे. ऐश्वर्याने २०१८ पासून स्वःताला पडद्यापासून दूर ठेवले आहे. पण कान्स फिल्म फेस्टीवलमध्ये ऐश्वर्याला पती आभिषेक आणि मुलगी आराध्याबरोबर बघून तिच्या चाहत्यांना मात्र सुखद धक्का बसला आहे.

याच कान्समध्ये ऐश्वर्याला मोठ्या पडद्यापासून लांब राहण्याचा प्रश्न विचारला गेला. त्यावेळी तिने स्वत:ची तुलना PROVERBIAL TORTOISE बरोबर केली. तसेच या वर्षांमध्ये मी स्वतला आणि कुटुंबाला वेळ दिल्याचं ऐशने सांगितले.

त्याचप्रमाणे तिने तिच्या आगामी प्रोजेक्टबदद्ल काही सांगितल नसलं तरी ऐश लवकरच दिग्दर्शक मणि रत्नम यांच्या PONNIYIN SELVAN मध्ये दिसणार असल्याची चर्चा आहे. ऐश्वर्या सध्या जरी बॉलीवूडपासून लांब असली तरी बॉलीवूड पार्टीज, लग्न, फिल्म फेस्टीवलमध्ये ती झळकत असते. कान्समध्ये ऐशला बघून तिच्या चाहत्यांना मात्र सुखद धक्का बसला आहे. तिच्या हटके ड्रेस स्टाईलपुढे दिपिका आणि पूजा हेगडे यासारख्या स्टाईल ऑयकॉन हिरोईनही फिक्या पडल्या आहे.






# कंगनाच्या ताफ्यात आली महागडी मर्सिडीज, किंमत ऐकून उंचावतील भुवया

बॉलीवूडची बिनधास्त अन् बेताल वक्तव्य करण्यात प्रसिद्ध असलेली अभिनेत्री कंगना रनौत आपल्या 'धाकड'(DHAAKAD) सिनेमामुळे सध्या भलतीच चर्चेत आहे. कंगना(KANGANA RANAUT) अनेकदा तिच्या वादग्रस्त विधानांमुळे अडचणीत आली आहे अन् त्यामुळे देखील तिला नकळत वाईट का होईना पण प्रसिद्धी मिळाली आहे. आता 'धाकड' सिनेमाची प्रदर्शनाआधी चर्चा रंगली असताना कंगना एका वेगळ्याच कारणामुळे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. सिनेमाच्या प्रदर्शनाआधी कंगनानं स्वतःलाच एक सुंदर गिफ्ट दिलं आहे.

बॉलीवूड क्वीन कंगना रनौतनं नवी कार(NEW CAR) खरेदी केली आहे. ज्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहेत. कंगनाच्या या नवीन कारची ब्रेकिंग बातमी सेलिब्रिटी सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडीओत कंगना काळ्या रंगाच्या प्रिंटेड ड्रेस असलेल्या आऊटफिटमध्ये आपल्या कुटुंबासोबत दिसली. या व्हिडीओत तिच्या बाजूलाच नवी कोरी मर्सिडीज कार उभी दिसत आहे. तर दुसऱ्या व्हिडीओत कंगनाची आई नव्या गाडीची पूजा करताना दिसत आहे.

# 'माझी आई माझ्यापेक्षा बोल्ड'- प्राजक्ता माळी




मनोरंजन विश्वात वेब सिरीज या माध्यमाने अनेक बदल घडवून आणले. हे बदल केवळ हिंदीत नाही तर मराठीतही झाले. अनेक दमदार मराठी वेब सिरीज प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात यशस्वी झाल्या. एवढेच नव्हे तर प्लॅनेट मराठी (PLANET MARATHI) च्या निमित्ताने मराठी मनोरंजन विश्वाला एक स्वतंत्र ओटीटी वाहिनी मिळाली. नुकतंच त्यांनी 'रानबाजार' (RAANBAAZAAR) या त्यांच्या नव्या वेब सिरीजची घोषणा केली आणि टिझर प्रदर्शित केला. या टिझरमध्ये प्राजक्ता माळी (PRAJAKTA MALI) आणि तेजस्विनी पंडितचे (TEJASWINI PANDIT) बोल्ड रूप पाहून त्यांना खूप ट्रॉल केले गेले. यावर अखेर प्राजक्ताने प्रतिक्रिया दिली आहे. या वेब सिरीज मध्ये प्राजक्ता माळीने एका वेश्याची भूमिका साकारली आहे. टिझरमध्ये तिचा प्रणय प्रसंगातील सिन समोर आला. अत्यंत बोल्ड अशा या सिनमुळे चाहते नाराज झाले. (PRAJAKTA MALI BOLD SCENE IN RANBAZAR) प्राजक्ता वर सर्व स्तरातून टीका होऊ लागली. प्राजक्ताने यावर सडेतोड भाष्य केले आहे. ती म्हणाली, 'मी जेव्हा ही सीरिज करण्याचा निर्णय घेतला तेव्हा प्रेक्षकांकडून अशा प्रतिक्रिया मला मिळणार हे अपेक्षित होतं. कारण आतापर्यंत मी ज्या पद्धतीच्या भूमिका साकारल्या आहेत. त्यामुळे प्रेक्षकांची ही प्रतिक्रिया स्वाभाविकच आहे.' अभिनेत्री प्राजक्ता माळी म्हणाली, 'मी पहिल्यांदा जेव्हा सीरिजचं कथानक ऐकलं तेव्हा प्रचंड उत्साहित झाले होते. काही नवीन, आव्हानात्मक करण्याची संधी म ल ा मिळत होती. त्यामुळे यातील कोणतीही भूमिका करण्याची माझी तयारी असल्याचं मी तेव्हाच जाहीर केलं होतं. माझी भूमिका ही कामाठीपुऱ्यातील सेक्स वर्करची असल्याचं प्रेक्षकांना ट्रेलर मधून समजलं आणि टीका होऊ लागली. पण मी जे काम केलं आहे ते सीरिजच्या कथनकाला पूरक असं आहे. त्या कथानकाची ती गरज आहे हे प्रेक्षकांना सीरिज पाहिल्यानंतर नक्कीच लक्षात येईल.'



# सोहेल खानसो बत घटस्फोट घेतल्यानंतर सीमा खानने उचलले महत्त्वाचे पाऊल

बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानचा धाकटा भाऊ सोहेल खान आणि त्याची पत्नी सीमा खान यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे. लग्नाच्या २४ वर्षांनंतर ते दोघेही घटस्फोट घेत आहेत. यामुळे सर्वांनाचा धक्का बसला आहे. काही दिवसांपूर्वीच त्या दोघांनी घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. यानंतर आता नुकतंच सीमा हिने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. तिने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटमध्ये मोठा बदल केला आहे. सीमा खान ही इन्स्टाग्रामवर कायमच सक्रीय असते. ती नेहमी विविध फोटो आण व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असते. सोहेल खानसोबत लग्न झाल्यानंतर सीमाने इन्स्टाग्रामवर फक्त सीमा हेच नाव ठेवले होते. मात्र त्यानंतर काही वर्षांनी तिने त्या नावात बदल करत सीमा खान असे केले होते.

# विजय-समंथाचा 'लीपलॉक' अन् 'इंटिमेट' सीन





समंथा रुथ प्रभू आणि विजय देवरकोंडा हे दोघेदी दाक्षिणात्य सिनेमातील प्रसिद्ध स्टार्स. लवकरच हे दोघे साऊथच्या 'कुशी' सिनेमात आपल्याला एकत्र दिसणार आहेत. काही दिवसांपूर्वी सिनेमाच्या टायटलची घोषणा निर्मात्यांतर्फे करण्यात आली होती. या सिनेमाचं दिग्दर्शन शिवा निर्वाणा करीत आहे. निर्मात्यांनी प्रेक्षकांना टायटलची घोषणा करताना एक वचन दिलंय की सिनेमा पाहताना एकामागून एक सरप्राइज पहायला मिळेल. यानंतर आता लगेचच बातमी कानावर पडतेय की या सिनेमात समंथा रुथ प्रभु आणि विजय देवरकोंडा मध्ये अनेक 'लीप-लॉक' सिन पहायला मिळतील. जेव्हा विजय समंथाच्या 'सैम जैम ऑन' या शो मध्ये गेला होता तेव्हा तो म्हणाला होता की,"मी आतापर्यंत समंथासोबत कधीच लीप-लॉक सीन दिला नाही". आता 'कुशी' सिनेमातून विजयनं ती हौस भागवली की काय असं म्हटलं जात आहे. बोललं तर असंही जातंय की,केवळ लीपलॉक सीन नाही तर काही इंटिमेट सीनही या दोघांचे या सिनेमात पहायला मिळतील. गेल्या आठवड्यात समंथा आणि विजय दोघांनी आपल्या चाहत्यांसोबत सिनेमाच्या सेटवरचे गाणं शूट करतानाचे काही फोटो देखील शेअर केले आहेत. शिवाय गाण्याच्या शूटिंगचा एक व्हिडीओ देखील शेअर केला आहे. यामध्ये विजय-समंथा सिनेमाच्या टायटल ट्रॅकवर रोमँटिक होताना दिसले आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### विराट कोहलीला धोका : ज्याला गिफ्ट केली बॅट त्यानेच घेतली विकेट



**नवी दिल्ली । महाईन्यूज**

अफगाणिस्तानचा रशिद खान आणि टीम इंडियाचा विराट कोहला यांच्यात मैदानाबाहेर मैत्रीचे नातं पाहायला मिळतं. याची प्रचित कालच्या सामन्यापूर्वी आली. काल सायंकाळी गुजरात टायटन्स विरुद्ध आरसीबीविरुद्ध सामना खेळवण्यात आला. या सामन्यापूर्वी विराट आणि रशिदचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यामध्ये दोघेही सराव करताना दिसले आणि कोहलीने विराटला बॅट गिफ्ट केल्याची चर्चादेखील रंगली. दरम्यान, सायंकाळी झालेल्या सामन्यात रशिदने विराटची विकेट घेतली.

### 25 वर्षीय निखतने फ्लाई वेट प्रकारात अंतिम फेरीत थायलंडच्या जुटामास जितपोचा केला पराभव

# तिरंग्याची शान वाढवणारी निखत झरीन!

### हक्कासाठी मेरी कोमशी भिडली होती

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

भारताची बॉक्सिंगपटू निखत झरीनने जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत देशाला एकमेव सुवर्णपदक जिंकून दिले. २५ वर्षीय निखतने फ्लाई वेट प्रकारात (५२ किलो) अंतिम फेरीत थायलंडच्या जुटामास जितपोचा पराभव केला. भारताच्या या युवा खेळाडूने ५-० अशा फरकाने ही लढत जिंकली.

भारताला महिलांच्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये ४ वर्षानंतर गोल्ड मिळाले. याआधी भारताला २०१८ साली एमसी मेरीकोमने सुवर्ण जिंकून दिले होते. भारताने या स्पर्धेच्या इतिहासात १०वे सुवर्णपदक जिंकले आहे. त्यातील ६ सुवर्णपदक एकट्या मेरीकोमने जिंकली आहेत. याशिवाय सरिता देवी, जेनी आरएल आणि लेखा सी यांनी देखील सुवर्णपदक जिंकले आहे.



भारताने यावर्षी १ सुवर्ण आणि २ कांस्य पदक जिंकली. स्पर्धेच्या इतिहासात भारताने १२ स्पर्धेत १० सुवर्ण, ८ रौप्य आणि १९ कांस्य पदक जिंकली आहेत. एकूण ३७ पदकांसह भारत पदक जिंकणाऱ्या देशांच्या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. ६० पदकांसह रशिया अव्वल तर ५० पदकांसह चीन दुसऱ्या स्थानावर आहे. भारताने २००६ साली ४ सुवर्ण, १ रौप्य आणि ३ कांस्य अशी सर्वोत्तम कामगिरी केली होती.

### केकेआरकडून सामना घेतला हिसकावून

- निखतचा जन्म १४ जून १९९६ रोजी तेलंगणाच्या निजामाबाद येथे झाला. निखतने १३व्या वर्षी बॉक्सिंग ग्लव्स हाती घेतले. बॉक्सिंगमधील दिग्गज मेरीकोमशी अनेकदा निखतची लढत झाली आहे. भारतीय बॉक्सिंग फेडरेशनने मेरीकोमला टोकिय ऑलिंपिकसाठी ट्रायल शिवाय ५१ किलो स्पर्धेसाठी निवडले होते.

- तेव्हा संघटनेचे चेअरमन राजेश भंडारी यांनी निखतला भविष्यासाठी तयार करत असल्याचे म्हटले होते. याविरुद्ध निखतने आवाज उठवला होता आणि थेट क्रीडा मंत्री किरण रिजिजू यांना पत्र लिहले होते. या सर्व वादानंतर मेरीकोमचे ट्रायल झाले होते. ही ट्रायल निखतविरुद्ध झाली, ज्यात मेरीकोमने विजय मिळवला.

- टोकिय ऑलिंपिकसाठी निखतने जेव्हा ट्रायलची मागणी केली होती तेव्हा मेरीकोमने पत्रकारांसमोर कोण आहे निखत झरीन असा प्रश्न केला होता. आता सुवर्णपदक मिळवल्यानंतर निखतने मेरीला उत्तर दिले. सुवर्णपदक जिंकल्यानंतर पत्रकारांना विचारले की माझे नाव ट्विटर ट्रेंड करत आहे का?

- निखतने २०१० साली नॅशनल सब ज्युनिअरमध्ये पहिले पदक जिंकले होते. त्याच्या पुढच्या वर्षी निखतने देखाला आंतरराष्ट्रीय पदक जिंकून दिले. तिने २०११मध्ये महिला ज्युनियर आणि युथ वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण जिंकले होते.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही